**RNI No. MAHBIL /2009/37831**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक १५६(२)] गुरुवार, ऑक्टोबर ३०, २०२५/कार्तिक ८, शके १९४७ [पृष्ठ १, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३९७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ ऑक्टोबर, २०२५.

**संदर्भः-** शासनाचे समक्रमांकाचे दि.२६.०९.२०२५ चे आदेश.

**आदेश**

**महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ आणि नियम, १९६७.**

क्रमांक बासनि-०१२५/प्र.क्र.३७७/२१-स.— ज्याअर्थी, राज्यात काही जिल्ह्यात अतिवृष्टी सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने, सदर नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांना कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्यास अडचणी येण्याची शक्यता विचारात घेता, शासनाने संदर्भाधिन दि.२६.९.२०२५ च्या शासन आदेशान्वये महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलम १४(३)(अ) मधील तरतूदीनुसार, ज्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूक प्रक्रिया मा.न्यायालयाच्या निर्णयानुसार घेणे क्रमप्राप्त आहे, अशा बाजार समित्यांच्या निवडणूका वगळून राज्यातील उर्वरित कृषि उत्पन्न बाजार समित्यांची निवडणूक प्रक्रिया दि.२६.९.२०२५ पासून ४५ दिवस पुढे ढकलेली होती.

ज्याअर्थी, आता राज्यात अतिवृष्टी सदृश्य परिस्थिती निवळलेली असल्याने, राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांची निवडणूक प्रक्रिया पुनश्च सुरु करणे उचित होईल, अशी शासनाची धारणा झाली आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलम १४(३)(अ) च्या तरतूदीअन्वये शासनास प्राप्त असलेल्या अधिकारांनुसार खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेतः-

“संदर्भाधिन शासन आदेशान्वये राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांची निवडणूक प्रक्रिया ज्या टप्प्यावर थांबविण्यात आली होती, त्या टप्प्यापासून या आदेशाच्या दिनांकापासून सुरु करण्यात यावी.”

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**माधवी सं.शिंदे,**
शासनाचे अवर सचिव.



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.